महाराष्ट्र परावैद्यक परिषद,मुंबई.
गेट क्र .०२, कामा व आल्बेस रुग्णालय, पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत,महानगर पालिका मार्ग, धोबी तलाव, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०
ई-मेल आयडी-mpmcmumbai2017@gmail.com
वेबसाईट-www.maharashtraparamedicalcouncil.org

जा.क्र.मपवैप/परिपत्रक -२०२३(१)/३७ /२०२३,  दि. १३.०२.२०२३.

# परिपत्रक

महाराष्ट्र परावैद्यक परिषद बैठक क्र. २३/२०२३ दि.०३.०२.२०२३ रोजी च्या बैठकीतील विषयामधील मुद्दा क्र.२ नुसार उपरोक्त विषयास अनुसरून अर्जदारांना नोदणीप्रक्रियेसाठी मंजुरीचा ई-मेल पाठवल्या नंतर मागील चार वर्षाचा काळवधी उलटून बऱ्याच अर्जदारांची नोंदणी प्रक्रिया प्रमाण पत्र पडताळणीसाठी प्रलंबीत आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र परावैद्यक परिषदेच्या दि. ०३.०२.२०२३ च्या बैठकीत नोंदणी प्रक्रियेतील प्रलंबीत अर्जाबाबत खालील प्रमाणे सर्वानुमते ठरविण्यात आले.

उपरोक्त संदर्भाकीत पत्रानुसार नोंदणी प्रक्रियेबाबत दि. २५.११.२०२२ रोजीच्या बैठकीतील चर्चे नुसार प्रलंबीत अर्जदारांना ३० दिवसाची मुदत वाढ देण्यात आली होती. परंतु अद्यापही बरेच अर्जदार परिषदेस नोंदणी प्रक्रियेसाठी हजर राहीले नाहीत. व त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. त्यासाठी दि. ०३.०२.२०२३ रोजीच्या बैठकीत ज्या अर्जदारास नोंदणी प्रक्रियेसाठी पाठविण्यात आलेल्या ई मेल च्या दिनांका पासून पुढे ४५ दिवसांच्या आत नोंदणी प्रमाणपत्र पडताळणीसाठी परिषदेच्या कार्यालयात हजर रहावे अन्यथा त्या पुढे रु.२०००/-इतके विलंब शुल्क (लेट फी) आकारण्यात येईल व त्यानंतरही अर्जदार परिषदेस हजर न राहिल्यास पुढील प्रत्येक महिन्यास रु. २००/- या प्रमाणे विलंब शुल्क (लेट फी) आकारण्यात यावे. असे खालील उपस्थीत मान. सर्व सदस्यांनी सर्वानुमते ठरविण्यात आले.

१. मान. श्री. उमेश सोनार (अध्यक्ष)
२. मान. श्री. संजय सरोदे (उपाध्यक्ष)
३. श्री.कुमार पाटील
४. श्री. श्रीपाद करंदीकर
५. श्री. शहाजी माने
६. श्री. विनायक देसाई
७. श्रीमती. नसरीन पाटनकर
८. श्री. राजाभाऊ गरुड
९. डॉ. श्री. शशिकांत खैरे

प्रबंधक
महाराष्ट्र परावैद्यक परिषद